नोंदणी क्र. एफ.१५०९३(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग

# राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in ई-पत्ता project3.rmvs@gmail.com

## "मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे"

**सन २०२३-२४**

महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत **मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे** व या उपक्रमांतर्गत, निश्चित केलेल्या विहित कार्यपद्धती व निकषांना अनुसरून मान्यताप्राप्त मराठी भाषा युवक मंडळांतून निवड झालेल्या प्रत्येक पात्र मंडळाला वार्षिक रु. १०,०००/- इतके अनुदान सहाय्य करण्यात येणार आहे.

या उपक्रमांतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दिनांक ०१/०३/ २०२४ ते १५/०३/२०२४ या कालावधीत, विहित नमुन्यात गुगल अर्जाद्वारे (Google Form) देशातील मराठी भाषा युवक मंडळांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

याबाबतची अधिक माहिती तसेच, या उपक्रमाची कार्यपद्धती व निकष, मार्गदर्शक सूचना, विहित गुगल अर्ज राज्य मराठी विकास संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर **मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करणे** या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.